<u>अत्यंत तातडीचे</u>

<u>स्मरणपत्र</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र
क्र.नासुके/१/कावि/१२५/२०१७
दिनांक :- ०२/०५/२०१७

**विषय :- माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत श्री.सुहास हळदणकर यांनी सादर केलेल्या अर्जांची माहिती पाठविणेबाबत...**

**संदर्भ :- १) मा. राज्य माहिती आयुक्त यांचेकडील दि. १२/०४/२०१७ रोजीचा ई-मेल**
**२) परिपत्रक क्र.नासुकें/१/कावि/९६/२०१७ दि.१३/०४/२०१७**

**परिपत्रक,**

मा. राज्य माहिती आयुक्त यांचेमार्फत प्राप्त झालेल्या संदर्भिय क्र.१ चे ई-मेलनुसार दि.०१/०३/२०१६ ते दि.०७/०४/२०१७ या कालावधीत माहिती अधिकार कार्यकर्ते श्री.सुहास हळदणकर यांनी माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत सादर केलेल्या अर्जांची सविस्तर माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत आदेश दिलेले आहेत.

उपरोक्त संदर्भिय क्र.२ चे परिपत्रकान्वये आपले विभागात श्री.सुहास हळदणकर यांनी दि.०१/०३/२०१६ ते दि.०७/०४/२०१७ या कालावधीत माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत सादर केलेल्या अर्जांची सविस्तर माहिती दि.२१/०४/२०१७ रोजी पर्यंत पाठविणेबाबत कळविले आहे. तरी अद्याप बऱ्याच विभागांनी सदरची माहिती सादर केलेली नाही. सदरची बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. सदरची माहिती अत्यंत महत्त्वाची असून त्याचा आढावा मा.राज्य माहिती आयुक्त घेणार असून माहिती पाठविताना माहिती निरंक असेल तर ती व्यवस्थितरीत्या खातरजमा करुनच पाठविण्यात यावी. त्यामुळे आपण पाठविलेली माहिती जर भविष्यात चुकीची आढळून आल्यास संबंधितांवर / विभागप्रमुखांवर दंडात्मक कारवाई करणेत येईल याची सर्व विभागप्रमुखांनी नोंद घ्यावी.

तथापि, ज्या विभागांनी सदर माहिती अद्याप सादर केली नसेल त्यांनी दि.०५/०५/२०१७ रोजी दुपारी ४:०० वाजेपर्यंत पाठवावी. सदरची माहिती तातडीने महानगरपालिका वेबपोर्टलवर प्रसिद्ध करावयाची असलेने विहित मुदतीत ज्या विभागांनी सादर केली नाही अशा **<u>विभागप्रमुखां विरुद्ध शिस्त भंगाची कारवाई प्रस्तावित करणेत येईल</u>** याची नोंद घ्यावी.

**अतिरिक्त आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८

प्रति,
सर्व विभागप्रमुख